

# तीर्थावळ

श्रीजीवोत्तमतीर्थ विरचित काव्याचे ओवीबध्द रूपांतर





मठाधिशांचे आराध्य दैवत श्रीवीरविठ्ठल



श्रीभूविजय विट्ठल प्रतिमा (गोकर्ण)



श्रीदिग्विजय विट्ठल प्रतिमा (बसरूर)

# पूर्वकथन

परम पूज्य श्रीजीवोत्तमतीर्थ विरचित ''तीर्थावळ'' या काव्याचा हा एक नवा आविष्कार. मूळ काव्याचा आशय, विषय व शब्द योजनेला बाधा येऊ न देतां समग्र 'तीर्थावळ' ओवीबध्द करण्याचा श्री-प्रकाश गोपिनाथ आचार्य यांनी केलेला प्रयत्न यशस्वी झाला आहे.

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ परंपरेतील तिसरे स्वामी प.पू. श्रीजीवोत्तमतीर्थ हे त्यांच्या विद्वतेप्रमाणे योगसिध्दि व प्रासादिक वाणीबद्दल विख्यात होते. प्रतिकूल परिस्थितीत, साधनसोयीचा अभाव असतांनाहि गंडकी शालिग्राम क्षेत्राची त्यांनी यात्रा केली व आसेतु हिमाचल सर्व तीर्थक्षेत्रांच्या यात्रांच्या निमित्त्याने देशाटन करून आपले जीवन अनुभव समृध्द केले. या साऱ्या तीर्थांची महती वर्णन करण्यासाठी त्यांनी 'तीर्थावळ' हें काव्य लिहिले. प.पू. श्रीजीवोत्तमतीर्थांच्या वाणीतून उत्स्फूर्तपणे काव्य निघायचे. त्यांनी आपल्या मधुर कंठाने उच्चारलेल्या काव्यपंक्तींचे श्रोते श्रध्देने श्रवण करायचे.

''तीर्थावळ'' हें काव्य मुळांत कोणत्या भाषेतून रचलें गेले याबद्दल जाणकारांमध्ये मतभिन्नता आहे. श्रीमठाच्या दफ्तरांत 'तीर्थावळ'चा मराठी अनुवाद असलेली एक हस्तलिखित प्रत चालू शतकांत सांपडली. तिला व्यापक प्रसिध्दिहि मिळाली. त्या हस्तलिखिताच्या आधारे ''तीर्थावळी''ची पुनर्रचना करण्यांत आलेली आहे.

बसरूर हें प.पू. श्रीजीवोत्तमतीर्थाचे गांव. येथील मठांत त्यांनी गंडकी यात्रेत उपलब्ध झालेली श्रीदिग्विजय विठ्ठलाची प्रतिष्ठापना केली आहे. योगायोगाने गंडकी यात्रेची यशस्वी परिपूर्ति केल्यानंतर मठाधीश प.पू. श्रीविद्याधिराजतीर्थ चालू प्रमाथीनाम संवत्सरांतील चातुर्मास व्रताचे आचरण बसरूर मठांत करीत असतांना प.पू. श्रीजीवोत्तमतीर्थांची पुण्यतिथी साजरी होत आहे. विशेष म्हणजे गंडकी यात्रेहून परततांना प.पू. श्रीजीवोत्तमतीर्थांनी आणलेली व मागाहून मठाधिशांचे आराध्य दैवत बनलेली श्रीवीरविठ्ठलाची प्रतिमा बसरूर मठांत वास्तव्य करून असल्याने उभय विठ्ठलांच्या साक्षीने प.पू. श्रीजीवोत्तमतीर्थांची पुण्यतिथी साजरी

होत आहे. (गंडकी यात्रेतून आणलेली तिसरी प्रतिमा ही श्रीभूविजय विठ्ठलाची असून ती गोकर्ण मठांत विराजमान आहे.) या मंगल प्रसंगी 'तीर्थावळ' नव्या स्वरूपात प्रसिध्द करण्याचा योग आला याची धन्यता वाटते.

**- वासुदेव व. शे. धेंपे**
(अध्यक्ष, श्रीसंस्थान गोकर्ण
पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी)

**बसरूर, कर्नाटक**
भाद्रपद शुक्ल ५ मी शके १९२१
बुधवार, दि. १५ सप्टेंबर १९९९.

## श्रीमत् जीवोत्तमतीर्थ विरचित

# तीर्थावळ

(या मूळ काव्याचें प्रकाश गोपीनाथ आचार्य यांनी अनुसर्जित केलेलें ओवीबद्ध रुपांतर)

### श्रीवीरविट्ठल वंदन

हे श्री वीरविट्ठला अनंता। जें जें घडविलें त्या त्या वृत्तांता।
वंदुनी करितों तयाची सांगता। कृपा करी मजवरी।।
तूंची समस्तांचा आधार। तुजयोगें घडलें साहस अपार।
चित्तीं तुझीया लागो हें अस्थिर। मन आमुचें सर्वदा।।

### श्री गुरुवंदन

आतां नमितों साधूसंतां। गुरूजनां श्री विट्ठलाचे भक्तां।
ऐकवितों तीर्थांचें महात्म्य आतां। श्रीवीरविट्ठलकृपें घडविली।।
घडविली आसेतुहिमाचल यात्रा। हे विट्ठला ही लागो सप्तपात्रा।
श्रवणी मिळावी पुण्याची मात्रा। शिष्यवर्गासी नि तवभक्तां।।
धन्य होईन कृतकृत्य होईन। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा तूं श्रीवीरविट्ठल हरी। तुला आमुचा दंडवत।।

### श्री तीर्थवंदन

ब्रह्मपुराणीं तीर्थांचे प्रकार। गणिले योजिले गेले चार।
दैव, आर्ष, मानुष, आसुर। निर्मीतीनुसार जाणावें।।
गोदावरि तुंगभद्रादि गंगा। काशी पुष्कर तैसी प्रयागा।
देवांनी निर्मियलीं जी गा। देवनिर्मितीं जाहली।।

प्रभास, नरनारायण, बद्रीकाश्रमें। इत्यादी गणलीं पवित्र धामें।
ऋषीमुनीनी निर्मियली तमामें। आर्ष म्हणूनी पूजिलीं।।
अंबरीश, पुरू, मनू तैसे मुनी। निर्मियली पुण्यप्रतापी राजानी।
मानिली मानुष म्हणोनी भक्तांनीं। त्या सर्वांसी नमन हें।।
गया असूर निर्मित एकमात्र। तरी पावन पुण्यक्षेत्र।
तयासी तुळना नसे अन्यत्र। स्वर्गमतीं पाताळीं।।
तीर्थे अमुचे मायबाप। तीर्थे अमुची हरती ताप।
तीर्थांसम नाही जीवनी माप। पुण्य सन्तांचें मापण्या।।
तीर्थ अमुचें श्रध्दा स्थान। तयाविणे नसे कांही पावन।
तेंच आमुचें मोक्ष साधन। त्रिलोकीं सर्वांसी।।
आम्हा साधूसन्ताचें स्थान। तीर्थें तैसे तयांचें स्नान।
भारतवर्षी कोटितीर्थांचें दर्शन। धन्य धन्य तूं विठ्ठला।।
श्रीविठ्ठलकृपें जें सांठविलें। तें मुक्त कंठें दान योजिलें।
शिष्यवर्गें जें करुनी आपुलें। मुक्त करावें आम्हासी।।
धन्य होईन कृतकृत्य होईन। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा तो वीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।

## १

गेलों विठ्ठलासंगें नरसिंहपुरा। राऊळीं शोभे नरसिंह बरा।
दर्शनें पातकां नाशिवतो खरा। पुण्यप्रभावी दर्शन।।
नीरा-भीमा संगमी केलें स्नान। यथोचित केलें वेदपठण।
जेथें विठ्ठल विठोबाचें रमलें मन। काय वाणूं सोहळा।।
"ही जटाश्रयीगंगादेवी। आपण ब्रह्मगिरीवरी धाडावी।
पापनाशीनी अभीष्टद व्हावी। पापक्षालन करावया।।"
मौनभावे बैसोनी कुशासनी। समाधीतत्पर व्रतध्यानी।
ऐसे त्या महर्षी गौतमाचे ध्वनी। निनादले कैलासीं।।
आकंठ ती गौतमाची स्तुती। ऐकोनी झाले शिव मुग्धमती।
प्रसन्ने प्रकटोनी ठाकती। वर देते झाले सत्वरी।।

"ब्रह्मतेजस समानीता। सर्वपापप्रणाशिनी।
महेश्वरी गौतमी गंगा। गोदावरी कामदायिनी।।
ऐसी नामे जरी परिचित । हे गौतमा ही गोदावरी गंगा।
सर्वभूत स्वरूपा सुनंदा। गोदावरी नामें प्रिय मज।।"
"हे अंबिकापती शक्तिमान। न होई मम समाधान।
हे त्र्यंबका तुमचें शांतीस्थान। निवास येथें असावा।।"
हें ज्योतीर्लिंग त्र्यंबकेश्वर स्थान। ब्रह्मगिरीवरी जाहलें पावन।
तयाच्या प्रदक्षणें मन प्रसन्न। आमुचें तैसें विठ्ठलाचें।।
ऐसी गोदावरी पापनाशिनी। कोटीतीर्थामृत जियेचें पाणी।
भक्तां भेटे पंचवटी स्थानी । संथ रूपें सुखद।।
सीतासंगें श्री रघुनंदन। पातले नाशिका वनवासी होऊन।
करण्या तेणी यज्ञयागहवन। गोदावरी तट निवडला।।
तीयेच्या नीरें घडतां स्नान। पुलकीत झाले पंचप्राण।
श्रीवीरविठ्ठलाचें प्रसन्न वदन। देखोनी जाहलों कृतार्थ।।
विंध्याचलीं जी उगम पावली। साधूसन्तानी माउली मानिली।
त्या वैतरणीये प्रणिपात करोनी जाहली। सुदृढ अमुची तपोशक्ती।।
भगीरथाच्या रथामागुनी चालत। सहस्त्र गिरीना विदीर्णि करित।
गंगा अलकनंदा उतरली गात। स्थान पुण्य तें गंगाद्वार।।
दक्षप्रजापती रायांकडून। येथे यज्ञेश्वर विष्णूचें जाहलें यजन।
निवडलें गंगेनें तेंचि स्थान। नाम दुजें हरिद्वार।।
यज्ञोत्सवासी आली कन्या सती। पहातां क्रुद्ध होई प्रजापती।
स्वागताविना होई रुष्ट सती। प्राण त्यागी तत्क्षणीं।।
जाहलें तीर्थक्षेत्र तें उत्तम। हरीतीर्थे केलें स्नान तर्पण।
ठायीं तीयेचें पूजापाठ ध्यान। धन्य झालों विठ्ठलकृपें।।
त्रिकाल स्नान कुशावती जलीं। पूजापाठस्तवन वटवृक्षसाउलीं।
सुरम्यवनराई देखिली प्राशिली। हृत्पटलीं विराजिलें स्थान तें।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।

# २

विंध्याचलीं जी उगम पावली। साधूंची माता सन्तांची साउली।
पुण्यप्रतापी तापी देखियली। धन्य झालों बाह्यांतरीं।।
त्रिलोकीं जो पुण्यकारक प्रख्यात । ऐसा तो अमरकंटक पर्वत।
नर्मदेचिये उगमे जाहला विख्यात। दर्शन केलें अलभ्य तें।।
स्नानें प्राशनें अश्वमेधाचें फल। पुराणकथित चांद्रायणव्रतफल।
ऐसें कावेरीनर्मदा संगमाचें बल। स्नाने तियेचीं विठ्ठलासी।।
यज्ञश्रेष्ठ कुबेरें करुनी स्नान। करुनी घेतलें महादेवासी प्रसन्न।
वरकृपें जाहला यक्षराज महान्। पुण्य ऐसें संगमी।।
नर्मदागंगेचा महिमा थोर। तटावरी कोटि तीर्थें अपार।
जलदर्शनमात्रें पापें दूर। दर्शन ऐसें सरितेचें।।
कपिलासंगम ॐकारतीर्थ। अंगारगत शुक्लतीर्थ।
नर्मदासागरसंगम कुब्जातीर्थ। ऐसीं श्रेष्ठतम तीर्थें नर्मदेंत।।
बावीस यांत वैष्णव तीर्थें। अठ्ठावीस शक्तितीर्थें।
मातृकाचीं सात तीर्थें। एक तीर्थ क्षेत्रपाल।।
जो कोणी करील हिचें स्मरण। होई पातकाचें निवारण।
तियेच्या जलें विठ्ठलासी स्नान। धन्य झालों विठ्ठला।।
जियेच्या तीरीं करी जपतप स्नान। गंगा जी वसिष्ठनामे परिचित।
त्या महेंद्रेचें स्नान यथास्थित। श्रमनिवारण करी तत्क्षणी।।
वैकुंठासम वांछनीय पुरी। विश्वकर्म्याची अनुपम कारागिरी।
दूरूनी देखिली द्वारकानगरी। सर्वव्यापी श्रीकृष्णाची।।
स्कंदपुराणी जें वर्णिलें स्थान। त्या स्वर्गद्वारीं केलें स्नान ।
तप, दान, पूजन अक्षय होऊन। पदरीं पडलें स्वर्गसूख।।
तयाआधीं गोमतीचे जलें स्नान। श्रीकृष्ण सन्निधीं रमलें मन।
जाहलें वेदोक्त विठ्ठलासी पूजन। महिमा तयाचा काय वाणू।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्री वीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।

## ३

द्वारकाक्षेत्रीं 'चक्रतीर्थस्थान' । पंचधारानीं जें जाहलें पावन।
तैसें मणिपूरगिरीचें तें दर्शन। कौतुकलों त्या विठ्ठलासी।।
षण्मास द्वारके राहतां जें पुण्य। जोडिलें एक दिवस शंकूद्वारीं राहून।
पाहिला श्रीकृष्ण शंकरनारायण। दर्शने जाहलों कृतार्थ।।
पद्मतीर्थांमाजीं उदकाचीं कमलें। वाहिलीं शिरीं मन उल्हसलें।
अवियावन्निया स्थान देखिलें। तैसें तें गोपिकासरोवर।।
कावेरी जलें स्नान केलें प्रचोदिकें। गेलों अगस्तालीकुंडें पिण्डारिकें* ।
चतुर्भुज कृष्ण पाहिला सुखदरूपें। सायुध्यांआयुध्यां चार।।
रुक्मावती गंगा देखिली जियेने। जन्माश्रम हरण केले दर्शने।
दुर्वासमुनी जाहले ऋषेश्वर तपानें। कैसे वर्णू तयाचें महात्म्य ।।
- धन्य झालों।।

## ४

अनुपम देखिलें रुक्मीणीचें वन । श्रीकृष्णे जेथें केलें पाणिग्रहण।
तैसें कर्दमकुंडीचें करतां स्नान। हरली व्यथा श्रमाची।।
अमृतासममधुमतीयेचें नीर। तैसा घनतम तियेचा प्राकार।
जाहला प्रसन्न भक्तगणपरिवार। सुखावले श्रीवीरविठ्ठलही।।
खेतिके जावोनी केलें भीमकुण्डीं स्नान। मनोभावे केले आदिमातेचे स्तवन।
देखिलें हिडिंबेचें घनतम वन। रम्यस्थान सिध्दी साधकांना।।
स्वर्गगंगा मृगकुंडी करुनी स्नान। धवळापुरी श्रीदामोदराचें दर्शन।
मुचकुंदाची गुंफा देखिली जाणून। चित्त होई प्रसन्न।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्री वीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।

---

*( *आतां याचें नांव पिंडार असून हें द्वारकेपासून वीस मैल दूर जामनगर जिल्ह्यांत कल्याणपुर तालुक्यांत आहे.)*

५

प्रतापी प्रजापती दक्षाने। चंद्रासी केलें शापित क्षयरोगाने।
मुक्तीसाठीं ब्रह्मदेवासी गाऱ्हाणें। घातलें वसिष्ठादि ऋषीमुनिनी।।
चंद्राची होण्यास रोगमुक्ती। मृत्युंजयानें वृषभध्वजाची भक्ती।
करावी तीही प्रभास क्षेत्रीं। एकमात्र उपाय रोगमुक्तीसी।।
चंद्राने केलें शिवलिंग स्थापन। कोटि जपानें मृत्युंजयाचें ध्यान।
साकार झाले शिवभगवान। क्षयमुक्त होई चंद्रदेव।।
चंद्रभक्तीने होवोनी प्रसन्न। प्रभासक्षेत्रीं केलें शिव निवासस्थान।
सोमनाथ नामे राहिले विद्यमान। करावया रोगमुक्ती भक्तांची।।
ब्रह्मदेव शिवाचा येथे निवास। तयामुळें थारा नसे रोगांस।
पुण्य क्षेत्र कथिलें गेलें भक्तांस । रोग, पापमुक्ती व्हावया।।
शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांत। पहिलें लिंग हें सोमनाथ।
तयाच्या दर्शनें जाहलों कृतकृत्य। क्षयरोगी चंद्र होई जसा।।
अग्निकुडीं ब्रह्मकुंडीं कपिलादि गंगेत। स्नान करोनी जाहलो शुचिर्भूत।
भूतलीं चंद्रकुंड पापनाशन तीर्थ। स्नान केलें तयाचेंही।।
अनुपम देखिलें बल्लुकाचें तीर्थ। आठवले यादव श्रीकृष्णनाथ।
हिरण्याचे तीरी जे पडूनी मुर्च्छित । सदेही गेले वैकुठीं।।
द्वापरयुगीं एका यदुकुमाराने। विप्रासी अपमानीत केलें चेष्टेनें।
ग्रासलें यदुकुल ब्रह्मशापाने। चुकेल कैसा श्रीहरीही।।
यादव जाहले उन्मत्त। विध्वंस कराण्यासी आसक्त।
धर्माचरणी जाहले विमुक्त। पहाते झाले श्रीकृष्ण।।
पाहुनी यादवांची करणी। आठवे देवांना ऋषीशापवाणी।
ब्रह्मदेवें केली हरीची विनवणी। "संपलें अवतार कार्य तें।।
यदुकुलासी लागलें शापाचें ग्रहण। द्वारका करावी सागरासी अर्पण।
करावें लवकरी वैकुंठी प्रयाण। प्रभास क्षेत्रीं जावोंनी"।।
श्रीहरी म्हणाले ब्रह्मदेवासी ; "द्वारकेमध्ये अन्यही निवासी।
विप्रशाप नलगे तयांसी। मुक्त त्याना करणें कर्तव्य"।।

प्रभू श्रीकृष्णाच्या आदेशाने। पळूं लागले यदुवीरही भयाने।
तरी न सोडिलें तयांना शापवाणीनें। आपसी भांडूनी अंतरले।।
यदुकुलोत्पन्न कन्हयाही पळाला। प्रभासी एक अश्वत्थवृक्ष पाहिला।
तयाच्या साउलीं सुखाने पहुडला। करुनी ढोंग श्रमाचें।।
हलविला ऐसा पायाचा तळवा। व्याधासी मृगमुखाचा भास व्हावा।
श्रीहरीचा विचार कोणासी ठावा। व्याधानें साधिलें लक्ष्य तें।।
पारधी निमित्तमात्र ठरला। वैकुंठाचा नाथ वैकुंठासी गेला।
तयाच्या रूपें अश्वत्थ राहिला। दिङ्मूढ साक्षीदार।।
तें अश्वत्थस्थान जाहलें पावन। संगमी निघालों त्याला वंदुन।
कपिला-हिरण्या-सरस्वती संगमी स्नान। मंदिरीं दर्शन घेतलें कृष्णाचें।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्री वीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।५।।

## ६

जातां सूर्यकुंड देखिलें। जें का शांबाच्या कुष्टीं पै गेलें।
त्रिवेणी गुप्तप्रयागा स्नान केलें। जाहलें तें विधियुक्त जाहलें।।
म्लेंच्छ नगर उल्लोंघोनी जाता। सिध्दापूर संतोषलें विठ्ठलभक्तां।
सरस्वतीचे जलें स्नान होतां। प्रार्थना केली माधव चरणी।।
माता सरस्वतीचें आख्यान। जियेचें औदुंबर वनातून आगमन।
तियेच्या जलें पुष्करतीर्थ भरून। पुण्यतीर्थ जाहलें त्रिलोकीं।।
सरस्वती ब्रह्मदेवाची पुत्री असोनी। सरिता ती पुण्यसलीता, पुण्यदायिनी।
कनका, प्राची, सरस्वती, सुप्रभा, नंदिनी। पंचस्रोत हे पुष्करांत विद्यमान।।
म्हणोनि म्हणती तीयेसी पंचस्रोता। कार्तिकपौर्णिमेसी कृत्तिका नक्षत्र येतां।
तियेच्या जलें स्नानाचमन करतां। पापरहित होतो महापापी।।
कर्दमाचें तप पाहोनी जेथें। श्रीकृष्ण निवासी जाहले तेथें।
शांतिस्थान म्हणोनि पुराणी तें। गौरवलें तयाचें दर्शन केलें।।
देखिलें बिन्दुसरोवर सुंदर। कपिलमुनी बैसोनि तेथें तृणासनावर।
मातें ज्ञान उपदेशियेलें तें अमर। महामुनी जाहले उपदेशें।।

मंदाकिनीचीं स्नानें होवोनि। हिमालय पुत्र म्हणोनि जो प्रख्यात।
चढूनि गेलों तो अर्बुदा पर्वत। तेथें वसिष्ठाश्रमाचें स्थान देखिलें।।
देखीलें अंक्लेश्वराचें मंदिर। विख्यात पींगातीर्थ गीरीवर।
अंक्लेश्वराचे दर्शन मनोहर। करोनि लागलों प्रवासी।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।। ६।।

## ७

मेरुगिरीवरी ब्रह्मदेव बसले तपस्येसी। तयांना प्रेरणा तेथें यज्ञ करणेसी।
पुष्करतीर्थासमतीर्थ न आलें चर्चेसी। यज्ञवेदि उभारण्या।।
हें तीर्थ त्या कमलाचें रूप। ब्रह्मदेवनिर्मिती जाहली तें कमलपुष्प।
त्यांनी पाहिलें स्व उत्पत्तीचें स्वरूप। तेंची स्थान निवडलें।।
जेष्ठ पुष्कर ब्रह्मदेवासी। मध्यमपुष्कर श्रीविष्णूसी।
कनिष्ट पुष्कर महारुद्रासी। गुह्यक्षेत्र म्हणुनी ज्ञात।।
ऐसे सकलतीर्थांचें अधितीर्थ। कमलयुक्त अमृतासम उदक तयांत।
त्या जलाच्या आचमनें होवोनी सुचीत्त। देखिलें प्रख्यात महेशलिंग।।
देखिलें सार्णेश्वर धुर्जटी। तपस्वी, साधुसन्ताची येथें दाटी।
अन्य जगताची पडे तेथें विस्मृति। तपोध्यानास तैसें स्थान नसे।।
परशुरामें जेथ केला क्षत्रियसंहार। तेथें रक्तसरोवरें जाहली अपार।
पितरांसी तर्पण करोनी उतरविला भार। तें 'रामहरिदे' स्थान देखिलें।।
कुरुजांगलाच्या मध्यभागीं एक। जलमय पापनाशन पवित्र तीर्थ।
पृथूदक नामें जें विख्यात। जलमय म्हणुनी पृथोदक।।
प्रपितामहानी या तीर्थास। जलाग्नी पवन पृथ्वी आकाश।
या भूतांसह निर्मियलें प्रारंभीस। या सृष्टोत्पत्तीच्या।।
भूतलींचें ब्रह्मदेवें नीर्मित । तीर्थें, नद्या, सागर स्रोत।
तयांचीं सकल जलें येथें एकत्र। ऐसें पुण्यदायी तीर्थ हें।।
या तीर्थाचें करतां स्नान। जाहली तिथली यात्रा संपन्न।
श्रीमत्पदक कुरुक्षेत्र देखण्यासी मन। आतुरलें म्हणुनि संपविली।।

ब्रह्मदेवें एक निर्मियलें स्थान। तेथें प्रकटलें ब्रह्मसरोवर महान्।
जयामध्यें स्थित परशुराम कुंड पावन। तयाचें नाम कुरुक्षेत्र।।
प्रकटली येथें प्लक्षवृक्षांतुनि। सरिता सरस्वती भूमि छेदुनि।
कुरुने पंचयोजनें भूमि नांगरुनी। वसविलें रमणीय हें स्थान।।
स्यमंतपंचक ब्रह्मावर्त नामें परिचित। क्षेत्र हें अक्षय पुण्याचें द्योतक।
कुरुक्षेत्रनामें जाहलें विख्यात। पुराणी तैं वर्तमानी।।
सरस्वती मधुस्त्रवा मंदाकिनी। दृषद्वती, कौशीकी वैतरणी।
नी हिरण्वती या देवदुहितांनीं। स्थान केलें हें पवित्र।।
ऐसें हें कोटितीर्थंचे आगर। कुरुक्षेत्राचें दर्शन मनोहर।
करतें बाणेश्वराच्या भेटेसी आतुर। भेट घेतली तयाचीही।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।। ७।।

## ८

सूर्याची कन्या यमाची भगिनी। अदितिवनातुनी तप्तकुंडांतुनी।
येते यमुना शतसहस्त्रधारानीं। गंगेच्या भेटेसी आतुर।।
तियेच्या तटावरि प्रख्यात। इंद्रप्रस्थ, हस्तिनापुर, यमप्रस्थ।
तैसें देखिलें रमणीय वारणावत। फिटुनी फिटेना चक्षुऋण।।
मेरुशिरीं नीलपर्वत चढोनी वीरें। दुर्गा चंडी मानसेचीं मंदिरें।
देखिलीं तैसे ओघ चार धीरें। सीता, वालुकनंदा, भद्रा, चक्षू।।
चों दिशीं वाही वालुकनंदा। पवित्र करी ही चराचर गंगा।
ऐसी सहस्रमुखी देखोनि, आनन्दा। नाही राहिला पारावार।।
करुनी स्नाने तियेच्या जलें। मायापुर हरिद्वार देखोनी मन रमलें।
श्रीवीरविठ्ठल कृपा देखोनी सजलें। मिटुनि घेतलीं स्वलोचनें।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।८।।

## ९

आदिसत्ययुगी जाहली भू जलमय। तेव्हां रैभ्यांच्या तपस्येने हरीहृदय।
व्याकुळलें ते घेई आम्रवृक्षाश्रय। 'श्री' आश्रयें वृक्ष होई कुबडा।।
हरिद्वाराच्या उत्तरेसी हें स्थान। कुब्जाम्रक नामें जाहलें पावन।
वृक्षरूपें श्रीहरीचें दर्शन। दिलें तें ओळखलें मुनीनि।।
कुमुदरूपाकृतींत स्थित। हृषिकेश नामेहि परिचित।
स्नाने तयाच्या स्वर्गप्राप्ति निश्चित। ऐसीं दुर्लभ स्नानें जाहलीं।।
पाहिलें उष्णोदकाचें तप्तकुंडस्थान। धात्रीवन तैसें सिध्दान्तवन।
निर्ढावुनी गेलों चढून। उत्तुंग चित्तभंगपर्वतराज।।
देवप्रयागा पाहतां रामपद। श्री रघुनाथाचें दर्शन मोक्षप्रद।
सन्निधि विश्रांती होई सुखद। लागलों रघुनाथप्रसादे प्रयाणी।।
मंदाकिनीच्या तीरी श्रीविट्ठलरखुमाई। देवें दुर्लभ भोगावती गंगाई।
दर्शनें साता जन्माची पुण्याई। तैसे त्रियुगीनारायणाचें।।
भीमसेनें युध्दें जिंकिला जो सुर। शिरीं गदेचा घालोनी घाव घोर।
देखिलें तें पंचीपांडव केदार। धन्य जाहलों देखोनी।।
घेतलें दर्शन महेशाचें। कैलासाधिपती श्री सदाशिवाचें।
वैष्णवां नलगे पाप लिंगदर्शनाचें। भीमादर्शनें तें निश्चित।।
हंसतीर्थरूप कुंडाचें केलें स्नान। त्रितिकुंडाचें जल करोनी प्राशन।
श्रीवीरविट्ठलाचे करोनी पूजन। लागलों भीमाचलींच्या पंथा।।
अवघड देखिला भीमाचलपर्वत। धर्मशीला पाहोनी झालों कृतकृत्य।
परतलों मंदाकिनीच्या सान्निध्यांत। केलीं स्नानें तियेचीं परतोनी।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्रीवीरविट्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।९।।

## १०

हें पंचकेदार वंदोनी जातां। धवळेगंगातीरीं पंचप्रयागा देखतां।
महिमा तयाचा तुम्हां न कथितां। तयाचें मिळेल का तीर्थफल।।

भागीरथी-अलकनंदा देवप्रयाग। मंदाकिनी-अलकनंदा रुद्रप्रयाग।
सरस्वती-अलकनंदा केशवप्रयाग। संगम तीर्थें पवित्र हीं।।
तैसें नंदा-अलकनंदा नंदप्रयाग। पिंडार-अलकनंदा कर्णप्रयाग।
ऐसे हे पवित्र पंचप्रयाग। देखोनी जाहलों कृतार्थ।।
श्रीधरावती सायासें क्रमुनी। जणू खड्गद्वार उल्लंघोनी।
पाहिली वालुकनंदा मोहिनी। अमृतास तीयेचें नीर।।
जयाचे अधिपति नारायण। अनादिक्षेत्र बदरी आहे पावन।
नारदादि ऋषींनी केलें तीर्थसेवन। ती विशालपुरी पाहिली।।
शिवाचि प्रीति बदरीवर। दर्शनें जयाचे मुक्ती सत्वर।
शिवनारायणाचें सान्निध्य जोंवर। त्या केदार दर्शनें धन्य झालों।।
सर्वायुधिविष्णुरूप दर्शन। नारदानि करोनि एकचित्त ध्यान।
बदरीक्षेत्रीं घेतलें करून। त्या बदरीदर्शनें आनंदलों।।
श्रीनारायणाच्या आराधनें। श्री विठ्ठलासी पंचतीर्थांची स्नानें।
होतां ते वदले प्रसन्नतेने। वत्सा! होईल यात्रा सफल।।
पाहिला डोळे भरुनी पंडुकेश्वर। जो का पण्डूश्रापें ऋषेश्वर।
किरातवन देखिलें जें दुर्धर। जेथें किरातार्जुन युध्द जाहलें।।
देवदार भूर्जपत्रांचें वन। अवघड मार्ग इतुकें घन।
वनचर पाहोनी भीयालें मन। तरी तारिलें त्या वीरविठ्ठलें।।
पर्वतावरुनी उतरते ती गंगा। पाहोनी हुडहुडी सर्वांगा।
शक्ती वन्दीयाली त्या विठ्ठलासी गा। पहाण्या गंगेचा ओघ तो।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरी।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।। १०।।

## ११

तेथूनि जातां उत्तरप्रांता। श्रीशैलपर्वत उल्लंघोनी जातां।
शिणलों थकलों जातां येतां। श्री विठ्ठलनाम हृदयांत।।
विपल्हारी अंगी चढोनी। तापलों कष्टलों बहुत श्रमोनी।
तरी श्री विठ्ठल भक्तांनीं। ध्यास नाहीं सोडिला।।

सुरम्यें कपिलांचे कल्प। निर्जनी सोहळा जरी अत्यल्प।
पूर्ण करण्या आमुचे संकल्प। गोपाल भेटला विठ्ठला।।
कपिलांचें दुग्धें स्नानें विठ्ठलासी। करितां झाले मनी उल्हासी।
सत्वर लागलों प्रयाणासी। विठ्ठल नामे जपोनियां।।
वाटेंत देखिलें मानसरोवर। हंस क्रीडती स्वछंदे जलावर।
नीलांबर विराजिलें भूवर। दर्पण वाटे देवांचा।।
गंडकीचीं दृष्ये कल्पित। चक्षुपटलीं नाचती अखंडित।
श्रीवीरविठ्ठलकृपें फलित। पुराण आज वर्तमान।।
दिसूं लागला देवपर्वत। चाळीस कोस विष्णुक्षेत्र।
म्हणतां आलें गंडकी क्षेत्र। दृष्य चक्षुतें मावेना।।
तीर्थांत तीर्थोत्तम चक्रतीर्थ। तयांत विष्णुचें वास्तव्य नित्य।
दर्शने तयाच्या जाहलों तृप्त। मन आमुचें दोघांचें।।
शालग्राम ते दामोदर कुंड। न पडे उत्साहें खंड।
जयांच्या संगें श्रीवीरविठ्ठल। भय तयासी कोणाचे।।
गंडकीच्या तपाने होवोनी प्रसन्न। वर देते झाले विष्णुभगवान।
शालीग्रामरूपें तव गर्भांत येईन। इच्छा तुझी पुरविण्या।।
ऐसें वैकुंठासम गंडकीक्षेत्र। दामोदरकुंड नि चक्रतीर्थ।
स्नानें तयांची विठ्ठलासी अनेक। ध्यान लागलें वैकुंठीं।।
वैकुंठीं आमुचें लागतां ध्यान। दिसूं लागलें विष्णुपंचायतन।
पळीं आड झालें दृष्टीपथातून। दृष्टांत होई विठ्ठलाचा।।
म्हणाले न आली अजून वेळ। आधीं करावी यात्रा सफल।
कर्तव्याची ओढतां जी माळ। पूर्ण करावी निश्चयें।।
योग्य वेळ जेव्हां येईल। वार्ता तयाची तुम्हा कळेल।
निश्चिंत सेवा जी होईल। करावी ती तोंवरी।।
दर्शनें जियेच्या पवित्र होती। स्मरणें पापें नाशोनि जाती।
ऐसी गंडकीची तपोतीर्थ शक्ति। धन्य धन्य ती त्रिभुवनी।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।११।।

# १२

कलीयुगीं गंगा तीर्थोत्तम। तयामध्यें प्रयागादी संगम।
मोक्षार्थी मानवास अत्युत्तम। त्रिलोकीं हें तीर्थस्थान।।
गंगा यमुनामध्यें पृथ्वीचा जघन। येथें जो करी त्रिकाल स्नान।
जप, तप, पूजन, व्रतधारण। अश्वमेधयज्ञतुल्य फलाची प्राप्ति तयासी।।
गंगायमुनासरस्वती संगम। जो का वर्णिला त्रिवेणी संगम।
पुराणी जयाचें वटप्रयाग नाम। सकल तीर्थां राजप्रयाग।।
जेथें भागीरथीगंगा नि यमुना। धूतपापा सरस्वती नि किरणा।
हें पंचनदसंगमक्षेत्र सर्वांना। त्रिभुवनी पंचनदतीर्थ पावन।।
गंगा ईशान्यवाहिनी होते तें स्थान। तेथे स्थित बिंदुमाधव भगवान।
पंचनद घाटावरी विष्णुपदतीर्थ पावन। कलियुगी या तीर्थसम तीर्थ नसे।।
आम्हासी हें पंचनदतीर्थ सर्वश्रेष्ठ। आमुचे संबंध तेथें घनिष्ट।
तेथें श्रीमन्नारायणतीर्थांनी बांधविला मठ। सांप्रदायांसी तो पहिला।।
हें धर्मपदतीर्थनामें सत्ययुगीं। धूतपापतीर्थ नामें त्रेतायुगीं।
द्वापारीं बिंदुतीर्थ, पंचतीर्थ कलियुगी। ऐशी नामें पुराणी परिचित।।
येथें केला आम्ही निवास। वंदिलें विठ्ठलासी नि बिंदुमाधवास।
गुरुवर्यां श्रीमन्नारायणतीर्थांस। आम्ही ऋणीं त्या विठ्ठलाचें।।
गयासुराने करुनि तपस्या। मागीतला तीर्थोत्तम व्हावें वर असा।
विष्णुवरें सुरांपुढें ठाकली समस्या। सुरांसी कोणी पूसेना।।
ब्रह्मदेव गेले गयासुरासी। कायादान मागितलें यज्ञ करणेसी।
गयासुराने अर्पिलें शरीरासी। विष्णुवराची देवोनी कल्पना।।
ब्रह्मदेवें सांगितलें सत्वर। यज्ञासी अर्पिलें तूं स्व शरीर।
शिव विष्णुसह या स्थानावर। निवास करीन मी सर्वदा।।
हें गयाक्षेत्र पांच कोस। ब्रह्माविष्णुमहेशाचा नित्य निवास।
पिण्डदानानें पितृगण विष्णुलोकास। जातील हें धरावें निश्चित।।
या गयाक्षेत्री आम्ही जावोनी। पितृगणांसी दिधलें दंडाचें पाणि।
आलों बिंदुमाधवासि परतोनी। अनुभव देहसान्निध्याचा।।

बिंदुमाधवासि करोनि वंदन। वेदनाथाचें घेतलें दर्शन।
धर्मानुमोदित वराहक्षेत्री जावून। वैतरणीं निष्कलंक तीर्थ देखिलें।।
पुरुषोत्तमक्षेत्री जगन्नाथ वंदोनी। देखिला बळिभद्रेसी श्वेतवर्णी सहस्रफणी।
दक्षिणसागरें वंदियेली श्रीकृष्णवेणी। मंगळगिरीं दर्शन नरसिंहांचें।।
श्रीकूर्म दर्शने जाहलों प्रसन्न। गोदावरी पाहोनी सकल भक्तगण।
गेलों गंगातीर्थ संगमी भारावलें मन। सप्तधासागरा जी मिळाली।।
श्रीशैलशिखर उल्लंघोनी गेलों। मल्लिकार्जुन दर्शनें धन्य झालों।
संगमी स्नान करोनी परतलों। देखुनी स्वप्नी नसे तें घडतें।।
पितापुरम् अहोबल नरसिंह वंदिला। देखिला श्रीनिवासमहालक्ष्मीसह जो सजला।
विष्णुकांची शिवकाची तो प्रचंड सोहळा। अहाहा! महत्भाग्य मम हें।।
नमुन वरदराज पाहिला वरुणाचल। पहिला वासुदेव जो पहुडला अचल।
श्रीरंग वंदुनीया ब्रह्मैयाची पूजा सफल। करोनी लागलों प्रयाणी।।
कावेरी वंदूनी केलें सुरू प्रयाण। विठ्ठलासह पाहिले भक्तगण प्रसन्न।
गेलों पाहिले श्रीरंगपट्टणम्। चक्षुपटलीं रामायणाचें आख्यान।।
हे श्रीरामा रघुनन्दना। बांधिला सेतू रावणासी वधण्या।
तरी लंकापुरीस पीडण्या। दुष्टासी होई सहाय्य।।
बिभीषणाचें ऐकोनी भाषण। राघव झाले सावधान।
धनुष्यटोंकें टाकिला तोडून। सेतू पळीं अभेद्यसा।।
धनुष्यकोटि नामे परिचित। राघवचरणें जें विभूषित।
ऐसें हें पुराणपुण्य तीर्थ। दर्शन केलें तयाचें।।
रावणाचें करण्यासी दमन। राघवें केलें शिवध्यान।
रामाग्रहें पार्वतीपती प्रकटून। सामावले ज्योतीर्लिंगीं।।
हें रामेश्वराचें भूतलीं दर्शन। कोटितीर्थाचें विठ्ठलासी स्नान।
श्रीरामें जें केलें भूमी छेदुन। स्नान करण्या ईश्वरासी।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरीं।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।। १२।।

## १३

‘अ’ कार म्हणजे ब्रह्मदेव। ‘य’ कार तो विष्णुदेव।
‘ध’ कार हा रुद्रदेव। पुराणी अयोध्येचें हें नामवर्णन।।
भगवान् विष्णुची ही आदिपुरी। उभी जी सुदर्शनचक्रावरी।
मत्सीच्या आकाराची ही विष्णुपुरी। त्रिलोकीं असे प्रख्यात।।
शरयूतटी भ्रमरगुंजारव। वेलीचें हितगुज पक्ष्यांचा कलरव।
श्रीराम, विठ्ठल नामें यात्रा सुखावह। नाही सुखानुभुतीस शब्द।।
वसली जी शरयूगंगेच्या तटावर। रमणीय अयोध्यानगरी सुंदर।
श्रीरामजन्मविभूषित परिसर। देखोनी कर आमुचे जुळले।।
सहस्त्रधारातीर्थपासोनी पुर्वेस। सहाशेंछत्तीस धनुष्यें ऐसपैस।
स्वर्गद्वारतीर्थ उत्तम मोक्षार्थीस। देखिलें ते डोळे भरुनी।।
शरयूगंगेचें करुनी स्नान। घेतलें दर्शनेश्वराचें दर्शन।
उल्लंघिलें ब्रह्मवृत्ती नैमिषारण्य। गेलो गोमतीच्या तीरीं।
पवित्र संभलक्षेत्रीं जावोनी। कंलंकेचे तें रूप पाहोनी।
राहिलों सन्मुखीं हात जोडोनी। श्रीविष्णुसी जो अवतारील।।
देखिलें विष्णुमपान्तिक मधुवन। ब्रह्मसहित अंतर्वैर मन मोहून।
वैकुंठें जैशें शोभी व्दादशीवन। लागलों प्रयाणी गोकुळींच्या।।
श्रीकृष्णें जो वामकरीं धरिला। तो गोवर्धन पर्वत पाहिला।
काळीयाचा दाव जिंकला। देखिलें कालियामर्दन स्थान।।
अक्रूरघाट, अहिल्याशीळा देखिली। जी गौतमकुंडस्थानी रामें उद्धरीली।
राघवें जानकीं जेथ प्रणिली। वंदिलें त्या जनकगिरीस्थाना।।
पाहुनी भानुतट उज्जयनी शिंकेश्वरी। क्षिप्रागंगाजलें स्नानें सत्वरी।
माकाळी माकाळी वदुनी शिरीं। केलें क्षिप्राजलें प्रोक्षण।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरी।
माझा सखा श्रीवीरविठ्ठल हरी। तयासी आमुचा दंडवत।।१३।।

## १४

सप्तकुलपर्वतीं प्रथमकुलपर्वत। जातां पाहिला तो महेंद्रपर्वत।
स्थान जेथुनी उडाला पवनपुत्र। वन्दिलों पुण्य स्थान तें।।
पाहिला सर्वश्री पद्मनाभदेव। पहुडला जो कीं शोभे गोविंदराव।
तैसा प्रयाणी वंदिला जनार्दनदेव। सागरतीरीं किरायदेशीं।।
तेथोनी रजतपीठक्षेत्री जावून। मंदिरीं घेतलें श्रीकृष्णदर्शन।
तैसे देखिलें पुण्यक्षेत्र गोकर्ण। जें दक्षिणकाशी म्हणोनी परिचित।।
सागरतीरीं वंदिली आर्या। अटकेश्वरी स्नानें फुलली चर्या।
श्री विठ्ठलाची थोरवी गावया। शब्द पडे तोकडे।।
पंचगंगेवरुनी पाहिले श्रीहरी। मंजुळें संगमी स्नान करुनी सत्वरी।
लागलों प्रयाणी पंढरपुरीं। जेथें माझा सखा विठ्ठलहरी।।
राहुनी भीमारथीच्या तटीं उभे। न्याहाळीलें विठ्ठलरखुमाई समे।
सामोरी हनुमन्त पुण्डलीक उभे। तैसा खगेंद्र तेथें सेवेसी।।
तैसेची जावोनी राहिलों समोर। मागें पुण्यक्षेत्र चंद्रभागा सरोवर।
घातलें लोटांगण विठ्ठलचरणावर। वदलों हें श्रीविठ्ठला पाव तू।।
धन्य झालों कृतकृत्य झालों। पण आरत माझी पंढरपुरी।
माझा सखा तूं श्रीविठ्ठल हरी। तुला आमुचा दंडवत।।

**।। इति श्री जीवोत्तमतीर्थ विरचित तीर्थावळाख्यान संपूर्णम्।।**

---

## "तीर्थावळ" मध्यें उल्लेख झालेल्या तीर्थक्षेत्रांची सूचि.

सध्या ज्या नांवाने हीं तीर्थे ओळखलीं जातात तीं नांवें कंसांत दिलेली असून या तीर्थांचा उल्लेख "तीर्थांक"(गीता प्रेस, गोरखपुर) मध्यें ज्या पृष्ठांवर आहे त्या पृष्ठाचा क्रमांक दर्शविलेला आहे.

पंढरी (पंढरपुर) २५९
नरसिंहपुरा - २६०
निरभिडरंतिरी - (निरा-भीमा नदी)
गोदावरी - २४४
नाशिक - २४४
पंचवटी - २४५

ब्रह्मगिरी - २४८
वैतरणी (विंध्याचलांत उगम)
गंगाद्वार - २४८
कुशावती - २४७
तापी - २४०
नर्मदा गंगा - २२४

महेन्द्र - २२८
द्वारका - २१६
गोमती - २१६
स्वर्गद्वार - २१६
चक्रतीर्थ - (द्वारकापुरी) ४१०
शंकुद्वार - ४१३
पद्मतीर्थ - ४१३
गोपिकासरोवर - ४१३
पिंडारक - (पिंडतारक द्वारकापुरी) ४१४
चतुर्भुजकृष्ण - ४११
अगस्तिकुंड कावेरी - ४११
रुक्मावती गंगा - ४११
दुर्वासऋपेश्वर - ४१४
रुक्मिणीचं वन - ४१४
कर्दमकुण्ड - ४१९
मधुमति - ४१६
खेतिके - ४१५
भीमकुंड - ४१५
स्वर्गगंगा - ४२१
मृगकुंड - ४२१
मुचकुंद गुंफा - ४२१
धवळापुर - ४२१
देवदामोदर - ४२१
सोरटी सोमनाथ - ४१८
प्रभास - ४१८
अग्निकुंड - ४१८
ब्रह्मकुंड - ४१८
कपिला नदी - ४१८
निष्कळंक तीर्थ - ४१८
वल्लकतीर्थ - ( बाणतीर्थ, भालकतीर्थ) ४१९
हिरण्यतीर - ( देहोत्सर्गतीर्थ) ४१९
अश्वत्थ ४१८
संगम - (कपिला-हिरण्या-सरस्वती
समुद्रास मिळाल्या ते स्थान) ४१८
सूर्यकुंड - ४१७
गुप्त प्रियाग - ४१८
म्लेंच्छनगर - (अहमदाबाद)
सिध्दपुर - ४०१
विंदुसरोवर - ४०२
कपिलमहामुनी - ४०२
गोपाळ गोपिरुदन - ३९८
अर्बुदगिरी - ३९९
अंक्लेश्वर - ३९९
मंदाकिनी - ३९९
एकलिंग महेशीं
सार्णेश्वर
पुष्करक - २८९
यज्ञवराह - २९०
रामहरिदे - ८६
पृथूदक - (सूर्यकुंड) ८३
वशिष्ठसान्निधी - ८४
कुरुक्षेत्र - ७५, ७६ व ७७
भाणेश्वर - १
अदितिवन - ७८
इंद्रप्रस्थ - ८६
वारणावत – ८६
हस्तिनापुर - ८८
मायापुर - ६२
हरिद्वार - ६२
दुर्मंडल - (दुर्गा, चंडी, मानसा अशीं तीन मंदिरें)
६३, ६४
सीता - ६३, ६४
वालुकानंदा - ६३, ६४
भद्रा - ६३, ६४
चक्षु - ६३, ६४
नीलपर्वत - ६३, ६४
मेरूच्या मस्तकीं - ५८
कुम्भजाम्बुक हृषिकेश - (कुब्जाम्रकतीर्थ) ६२
देवप्रयाग - (भागीरथी- अलकनंदा संगम) ४९
तपोवन - (तप्तकुंड) ५३
रामपद - (रघुनाथमंदिर) ५३
त्रियुगी नारायण - ५५
मंदाकिनी - ५४
पंडपांडव - ५६
केदार - ५६
भीमागुंफा - (भीमशीला) ५६

महेशीं - ५६
तृतीकुंडी - ५६
हंसतीर्थ - ५६
धर्मशिला - ५५
भीमाचलपर्वत - ५६
मंदाकिनी - ५५
धवलगंगा - (दूधगंगा) ५२
पंचकेदार - ५६
पंचप्रयाग - (देवप्रयागः भागीरथी, अलकनंदा) - ४९
(रुद्रप्रयागः मंदाकिनी - अलकनंदा) - ५४
(नंदप्रयागः नंदा - अलकनंदा) - ५५
(केशवप्रयागः सरस्वती - अलकनंदा) - ६०
(कर्णप्रयागः पिंडार - अलकनंदा) ६१
(वटप्रयागः त्रिवेणीसंगम : गंगा, यमुना, सरस्वती)
श्रीधरावती - (वसुधारा) ६०
खड्गद्वार (स्वर्गद्वार) - ६०
वालुकानंदा - (अलकनंदा,अलकापुरी) ६०
बद्रिकाश्रम - ५९-६०
पाण्डुकेश्वर - ५८
किरातवन - ५८
श्रीशैल पर्वत - (कैलासपर्वत शिखर) ४०
मानसरोवर - ( आणि राक्षसतलाव) ३९
गंडकी - शालिग्रामनदी, अग्नीकुंड, मुक्तिक्षेत्र दामोदरकुंड गंडकीनदीच्या आजूबाजूच्या परिसराला विष्णुक्षेत्र असें गणलें आहे - - १५५
प्रयाग त्रिवेणी - ११५, ११६
वारणासी - १२६
बिंदुमाधव - १३०
गया - १६१
वेदनाथ - १६२
गंगासागर संगम - १८१
निष्कलंकतीर्थ - १९०
वैतरणी - १९०
पुरुषोत्तम क्षेत्र - (जगन्नाथपुरी) १९७
कृष्णवेणी - २५५, २५६
मंगळगिरी - ३३८
श्रीकूर्म - (सिंहाचल) ३३४
गोदावरी - ३३७
श्रीशैल शिखर - (मल्लिकार्जुन) १८०
अबळ नरसिंह - (अहोवल नरसिंह) १३१, १३३
पितापाणी - (पितापुरम्) ३३५, ३३६
विष्णुकांची-शिवकांची - ३३५, ३३६
वरदराज - ३५७
अरूणाचल - ३५२, ३५३, ३५४
श्रीरंगम् - ३७०, ३७१, ३७२
रामेश्वर - ३७४,३७८
धनुष्कोडी - ३८०, ३८१
अयोध्या - १४२
दर्शनेश्वर - १४३
गोमतीतीर - १४४
संभतक्षेत्र - ९१
मधुवन - ९५
व्रह्मसहित अंतर्वेर - १००
द्वादशीन - ९५
गोवर्धन - १००
कालियाचा डोह - (कालियामर्दन स्थान) १०३
अक्रुरघाट - १०४
अहल्याशिळा - गौतमकुंड - १५३
जनकगिरी - १५१
भानुतट - १४४
उज्जयनी शिंकेश्वरी - (अवन्तिकापुर) २४०, २५० क्षिप्रा
महेंद्रगिरी - सप्तमकुलपर्वतांत प्रथम कुलपर्वत - २०५
पद्मनाभ - ३९४,
जनार्दन - ३९५, ३९६
किरायदेश केरळ देश
रजतपीठ उडपीक्षेत्र - ३६७
गोकर्ण - ३१०
अटकेश्वर -
पंचगंगा - २६१
भीमरथी - २५९

☆



**श्री. प्रकाश गोपीनाथ आचार्य** ह्यांनी ओवीबध्द रूपांतरित केलेली 'तीर्थावळ' **श्री. चंद्रकांत शांताराम केणी** यांनी कुळागर प्रकाशन, मडगांव येथे मुद्रित करून श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठ कमिटी, पर्तगाळ, काणकोण - गोवा - ४०३७०२ तर्फे प्रकाशित.